पारावरच्या गप्पा

# ‘झिरो बजेट’ शेती म्हणजे मृगजळ!



नित्यनियमाप्रमाणे गणपत देवदर्शन घेऊन पारावर येऊन बसला होता, अर्थातच संपतची वाट पाहत... संपतही देवदर्शन घेऊन गणपतजवळ येऊन बसत म्हणाला, ‘‘कारं गंपा, आज फार निवांत दिसतोस?’’

यावर हसतच गणपत म्हणाला, ‘‘कुठला काय, निवांतपणा असतो व्हय आपल्या शेतकऱ्यांना! दिवसभर हाताला काम- नाही तर डोक्याला ताप. आता तुला मी दिसतो निवांत, कारण हात काही काम करत नाहीत म्हणून. पण माझं डोकं तर काम करतंय ना आणि तेही जास्त प्रमाणात!’’

यावर संपतने हसत विचारलं, ‘‘कारं बाबा, सकाळी सकाळीच डोक्याला कशाला लावलंय एवढं कामाला?’’

गणपतनेही हसतच उत्तर दिलं, ‘‘काय करणार संपा, पिकाला वापरायच्या सर्व गोष्टी दरवर्षी महाग होत चालल्या आहेत. मागील वर्षी तर खतांच्या किंमती अव्वाच्या सव्वा वाढल्या. बियाणे, कीटकनाशके यांचे भाव दरवर्षी वाढतात. मशागतीचे दरही दरवर्षी वाढतात. मजूरही दरवर्षी पगार वाढवून घेतात. आपणच एकमेव असे आहोत की दुसऱ्यांना पैसे वाढवून देतो, आपल्याला मात्र कोणी पैसे वाढवून देत नाही. भाव कोणाकडून वाढवून घ्यावा हेही कळत नाही आणि भाव वाढले तर मात्र शासनाचा जीव कासावीस होतो. मग कर आयात, कर निर्यातबंदी, घाल व्यापाऱ्यांवर धाडी, कर नवीन काहीतरी नियम! यातून मग वाढणारा भाव एकदम कोसळतो. कांदा- कापसाचे उदाहरण ताजे असताना ऊसाबाबत सुद्धा तीच परिस्थिती झालीय बघ. या सर्वांचा विचार केला तर संपा मी काय म्हणतो, यापुढे खर्च वाढतच जाणार आणि त्यानुसार तर आपल्या शेतीमालाला भाव वाढवून मिळणार नाही. अशा परिस्थितीमध्ये आपली शेती तोट्यात जाणार, आपण कर्जबाजारी होणार आणि शेवटी दुर्दैवानं नाईलाज म्हणून आत्महत्या करावी लागणार! हेच चित्र माझ्या डोक्यात फिरतंय आणि त्याचाच विचार करत होतो. शेवटी माझ्या मनाला वाटले की आपणही ‘झिरो बजेट’ शेती करावी की काय? गेल्या महिन्यातच देशाचा अर्थसंकल्प सादर झाला. त्यात अर्थमंत्री म्हणाल्या की, आपल्या देशातील एक कोटी शेतकऱ्यांना झिरो बजेट शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी प्रवृत्त करायचे. म्हटलं आपणही या एक कोटी शेतकऱ्यांपैकी एक असावं. झिरो बजेट म्हणजे काहीच बजेट नाही- म्हणजे खर्च करायचाच नाही आणि जो मिळेल तो पूर्णपणे फायदा! असा सर्व विचार करतोय बघ संपा. तुझं काय मत आहे यावर?’’

गणपतने अशी डोक्यातील सर्व विचारांना मोकळीक करून दिल्यानंतर संपतने बोलायला सुरुवात केली. तो म्हणाला, ‘‘गंपा, तू म्हणजे ते एकदम एक नंबरी आहे

बघ. आज शेतीचे अर्थशास्त्र एकदम बिघडले आहे. कधी कधी मलाही वाटते की शेती आपण कोणासाठी करतो? अन्नदाता म्हणवून घेतो यासाठी खाणाऱ्यांसाठी अन्नधान्य पिकवितो. भूमिपुत्र म्हणून घेतो यासाठी भूमातेची सेवा करून तिला तिच्या कार्यात मदत करतो. गावातील भूमिहीन मजुरांना काम नाही म्हणून त्यांच्या हाताला कामही देतो. गावातील कृषी सेवा केंद्र असो, मशागती करणारी यंत्रणा असो की व्यापारी वर्ग- यासारख्या अनेकांच्या प्रपंचाला आधार देण्याचे काम आपण करतो. परंतु आपल्यासाठी ज्यावेळी आभाळ फाटतं त्यावेळी ठिगळ लावायला मात्र कोणीच पुढे येत नाही. शेतकरी हा फक्त इतरांच्या पालनपोषणासाठी काम करतो. या बदल्यात त्याला किती मिळते, हा संशोधनाचा विषय आहे. मात्र गंपा हे सर्व खरं असलं तरी तू म्हणतो तशी आपली शेती झिरो बजेट शेती कधीच होऊ शकणार नाही. झिरो बजेट म्हणजे काहीच खर्च करायचा नाही, बिनखर्चाची शेती हे प्रकरण तर मला आतापर्यंत कळलंच नाही! असं कधी असतं का- की शेतीत काहीच करायचं नाही? मग शेती काय जंगलासारखी किंवा गायरानासारखी करायची की काय हेच कळत नाही! गंपा, हे बघ आपल्याला शेतीची खते, बियाणे, कीटकनाशके, तणनाशके विकत आणून टाकावी लागतात. पाणी देण्यासाठी वीज लागते, त्यासाठी वीज बिल भरावे लागते. प्रत्येक गोष्टीसाठी मजूर लागतात. त्यांना मजुरी द्यावी लागते. मशागती- मग त्या पूर्वमशागती असो की आंतरमशागती- त्या कराव्याच लागतात, त्याला पैसे द्यावे लागतात. शेतावर जाण्यासाठी साधन लागते, त्यासाठी पेट्रोल लागते. त्यालाही पैसे लागतात. आपला संपूर्ण वेळ शेतासाठी द्यावा लागतो. आपल्याला दिलेल्या वेळेची आणि केलेल्या श्रमांची किंमत बाहेर मिळाली असती ना? मग त्याची किंमत धरणार की नाही? जर हे सर्व करण्यासाठी पैसे लागतात, बजेट लागते तर मग ती शेती झिरो बजेट कशी होईल?''

खरं तर यावेळी गणपतला हसावे की रडावे तेच कळेना. कारण जेव्हापासून त्याने अर्थमंत्र्यांचे भाषण ऐकले होते तेव्हापासून त्याच्या डोक्यात झिरो बजेट शेतीचा किडा वळवळत होता. मात्र आता तर संपतने त्या किड्याची वळवळच थांबवली! वैतागून गणपत म्हणाला, ''मला तर हेच कळत नाही तू एक सांगतो, देशाच्या अर्थमंत्री वेगळे सांगतात... आम्ही ऐकायचं तरी कोणाचं? अर्थमंत्री जे सांगतात ते चुकीचे आहे की काय मग?''

यावर हसत संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, देशाच्या धोरणात्मक कार्यक्रमांमध्ये तज्ञ मंडळी नवनवीन संकल्पना सांगत असतात. देशापुढील प्रश्न आणि त्यासाठी उपाययोजना यासाठी तेही काहीतरी प्रयत्न करत असतात. याचा अर्थ त्यांनी सांगितलं ते अगदी शंभर टक्के बरोबर आहे असं नाही. परंतु त्यांचा प्रयत्न असतो की अशा संकल्पनेतून काही प्रश्न सुटायला मदत होईल. आता मी तुला सांगतो, आपल्या देशासमोरचे मुख्य प्रश्न कोणते आहेत ते... एक तर रासायनिक खते, कीटकनाशके, जास्त पाणी, अति मशागती, अयोग्य पीकपद्धती यांमुळे आपल्या जमिनी खराब होत चालल्या आहेत. जमिनीची उत्पादनक्षमता कमी होत असताना पिकाखालील जमिनी कमी होत आहेत. लोकसंख्या मात्र झपाट्याने वाढत आहे. अशा परिस्थितीमध्ये उत्पादनामध्ये सातत्य राखणे आणि वाढणाऱ्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी ठेवणे हा देशासमोरील एक महत्त्वाचा प्रश्न. दुसरा प्रश्न जो अर्थमंत्र्यांच्या दृष्टीने फारच किचकट आहे तो म्हणजे दरवर्षी रासायनिक खतांसाठी द्यावी लागत असलेली सबसिडी. मागील तीन वर्षांत रासायनिक खतांवरील सबसिडीमध्ये तिप्पट वाढ झाली. यावर्षी दोन लाख कोटी रुपयांच्या पुढे रासायनिक खतांवर अनुदान द्यावे लागले आणि हा आकडा पुढील वर्षी अधिकच वाढणार. याचा विचार करून शेतकऱ्यांना इतर शेती पद्धतींकडे नेऊन रासायनिक खतांचा वापर कमी करता आला तर सरकारचा पैसा वाचेल. खरं या दोन मुख्य बाबींमुळे झिरो बजेट शेतीचा प्रचार करायचे धोरण केंद्र सरकारने आखले आहे.''

यावर हसून गणपत म्हणाला, ''असं होय संपा, आता कळली खरी ग्यानबाची मेख. पण संपा, मग ही झिरो बजेट शेती म्हणजे काय? शासनाने एवढे का मनावर घेतले याबद्दल? झिरो बजेट शेती केली तर शेतकऱ्यांना ते परवडेल काय? वाढणाऱ्या लोकसंख्येला दोन वेळचे खायला मिळेल काय? एवढं उत्पादन काढायचं तर काय करावं लागेल?''

हसत संपत म्हणाला, ‘‘आरं गंपा, थांब. किती प्रश्न विचारणार? खरं तर शेती कधीच झिरो बजेट होऊ शकत नाही. एक मात्र आपण करू शकतो ते म्हणजे आपण शेतामध्ये जो खर्च करतो त्यात कपात करता येईल. रासायनिक खतांचा वापर कमी केला पाहिजे हे मला पटतं. म्हणूनच मी रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी सेंद्रिय पदार्थांचा वापर वाढवत आहे. पीक काढल्यानंतर पिकाचे उरलेले सर्व अवशेष जाळून न टाकता ते जमिनीत कसे मिसळले जातील यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. ऊसाचे पाचट, इतर पिकांचा भुस्सा, काड, कपाशीच्या पऱ्हाट्या हे सर्व बारीक करून जमिनीमध्ये मिसळले तर आपण रासायनिक खतांच्या वापरामध्ये ३० ते ४० टक्के कपात करू शकतो. तसेच रासायनिक खतांचा वापर ठिबकमधून केला तरीही खतांची बचत होईल. रासायनिक खतांचा वापर अनेकवेळा विभागून केला तर त्यांची वापर कार्यक्षमता वाढेल. त्यामुळेही खतांची बचत होईल. मशागती योग्य प्रमाणातच केल्या पाहिजे. जास्त मशागत केल्याने जमिनीचा ऱ्हास होतो कारण त्यामुळे जमिनीतील जीव-जिवाणूंची संख्या कमी होते. जमिनी जास्तीत जास्त सजीव ठेवणे महत्त्वाचे आहे. गरजेनुसार जिवाणू खतांचा वापर करणे, जमिनीचे परीक्षण करून त्यानुसार खतांचा वापर करणे, मुख्य अन्नद्रव्यांबरोबरच दुय्यम आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करणे यासारख्या बाबींमुळेही कमी रासायनिक खतांचा वापर करूनही उत्पादनात वाढ होते आणि उत्पादन खर्चात बचत होते. रोग-किडी कमी आल्यामुळे फवारणीचा खर्च वाचतो. तसेच ठिबकचा वापर केला तर जमीन भुसभुशीत राहून पिकाची वाढ चांगली होते. तणांचे प्रमाण कमी होऊन उत्पादन खर्चात बचत होते. म्हणून झिरो बजेट शेतीऐवजी ‘काटेकोर शेती पद्धती’चा अवलंब करणे गरजेचे आहे. आपल्या जमिनीला समजून घेतले पाहिजे. पिकासंगे बोलले पाहिजे. त्यानुसारच शेतीमध्ये काम केले पाहिजे. नैसर्गिक शेती, झिरो बजेट शेती या सर्व गोष्टी ऐकण्यासाठी किंवा वाचण्यासाठी चांगल्या असल्या तरी यातून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार प्रामुख्याने करावा लागेल. तसेच वाढत्या लोकसंख्येला खाण्यासाठी आवश्यक तेवढे पीक उत्पादन मिळाले पाहिजे. आपणच आपल्या शेतीचा तसेच पिकाचा चांगला अभ्यास करून शेती करावी लागणार आहे. शेती हे एक शास्त्र आहे तसेच शेतीला काही विशिष्ट परंपरा आहे. म्हणूनच शेती करताना शास्त्र आणि अध्यात्म यांचा योग्य मेळ घालण्याची गरज आहे. एका टोकाचा विचार न करता दोन्हींचा योग्य मेळ घातला तरच आपण शेती व्यवसायामध्ये यशस्वी होऊ.’’

या सर्व बोलण्यावर गणपतने होकारार्थी मान डोलावली व तो म्हणाला, ‘‘हो रे माझ्या संपा, खरं बोललास बघ. उगीच कोणी काही बोललं म्हणून आपण त्याच्या मागे न जाता आपला मूळचा शेतीधर्म जपला पाहिजे. चल, याबद्दल तुला छान स्पेशल चहा पाजतो.’’

**(सौजन्य: ‘पूर्वा कृषिदूत’ परिवार)** ■

# लेखकांना आवाहन...

**‘पूर्वा कृषिदूत’** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, ‘पूर्वा कृषिदूत’**